दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.८ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 8 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 253 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# साहेब.....! आपण गुटखा पकडला पण मटक्याचं काय?



**केज (प्रतिनिधी):बीड जिल्ह्यातील अतिसंवेदनशील म्हणून ओळखले जाणारे केज पोलिस ठाणे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. गुन्हेगारी घटनांमध्ये सातत्य असलेल्या केज तालुक्यात खून, दरोडा, विनयभंग, ॲट्रॉसिटीसारख्या गंभीर गुन्ह्यांबरोबरच अवैध धंदेही जोरात सुरू आहेत. यामध्ये गुटखा तस्करीप्रमाणेच मटक्याचा सुळसुळाटही चिंता वाढवणारा विषय ठरत आहे.**

दि. ०७ ऑगस्ट रोजी दुपारी १.५० ते २.०० या वेळेत केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्री. उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुटख्याच्या मोठ्या साठ्यावर कारवाई करण्यात आली. ट्रकमधून सुमारे १ कोटी रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई निश्चितच कौतुकास्पद असून, नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास वाढवणारी आहे.परंतु या कारवाईमुळे एक गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे - गुटखा पकडला, पण मटक्याचं काय? केज शहरातील तसेच तालुक्यातील अनेक भागांमध्ये - टपऱ्यांवर, हॉटेलांमध्ये, चौकाचौकात खुलेआम मटक्याचा खेळ सुरू असतो. अनेक बेरोजगार तरुण या जाळ्यात अडकले आहेत. महिलांमधूनही मटक्याच्या विळख्यामुळे घराचे आर्थिक संतुलन ढासळल्याच्या तक्रारी वेळोवेळी ऐकायला मिळतात. दिवसेंदिवस या अवैध धंद्याची व्याप्ती वाढत असून, पोलीस प्रशासनाचे याकडे लक्ष नसेल का, असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत. गुटख्यावर जशी ठोस कारवाई झाली, तशीच कडक कारवाई मटक्यावर होणार का? पोलीस निरीक्षक उनवणे साहेब यांनी केलेली गुटखा कारवाई निश्चितच धाडसी आहे, मात्र आता जनतेची अपेक्षा आहे की केज शहर व तालुक्यातील मटक्याच्या साम्राज्यावरही गदा येईल. स्थानिक सामाजिक संघटना, पत्रकार, महिला बचतगट यांच्याकडूनही मटक्यावर कारवाईसाठी मागणी होत आहे. जर याकडे वेळीच लक्ष दिलं नाही, तर अनेक कुटुंब उध्वस्त होण्याचा धोका आहे.





## अंबाजोगाई येथे पासपोर्ट सेवा केंद्र स्थापनेची खा.सोनवणेंची केंद्रीय दळणवळण मंत्र्यांकडे मागणी

**केज । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापनेची मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली आहे.

अंबाजोगाई ही शैक्षणिक, आरोग्य, प्रशासकीय दृष्टिकोनातून महत्वाची आणि बीड जिल्ह्यातील प्रमुख नगरी आहे. तर जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापन करणे गरजेचे आहे. हे केंद्र स्थापन झाल्यास अंबाजोगाईसह केज, धारूर, परळी, माजलगाव या भागातील लोकांना देखील याचा लाभ होणार आहे. या मागणीचे निवेदन खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची दिल्ली येथे भेट घेऊन सादर केले. तर या आपल्या पाठपुराव्यातून लवकरच ही सुविधा अंबाजोगाईत सुरु होईल, अशी खात्री ही खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली.

## महादेव मुंडे खून प्रकरण कुठली ही माहिती असल्यास कळवा

### एसआयटी प्रमुख पंकज कुमावतांचे थेट नागरिकांना आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यात गाजत असलेल्या परळीतील महादेव मुंडे खून प्रकरणाची चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एसआयटीने आता या प्रकरणाचा तपास गतीमान केला आहे. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाची कुठलीही माहिती असल्यास त्यांनी ती पोलिसांनी द्यावी, असे आवाहन एसआयटी प्रमुख आयपीएस पंकज कुमावत यांनी बुधवारी (दि.६) आहे. त्यासाठी कुमावत यांनी त्यांचा व्हाट्सअप क्रमांक उपलब्ध करुन दिला असून माहिती देणाऱ्याचे नाव पुर्णपणे गोपनीय ठेवून संबंधिताला बक्षिस देणार असल्याचीही घोषणा केली आहे.परळी येथील व्यापारी महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून नियुक्त करण्यात आलेल्या एसआयटीचे प्रमुख पंकज कुमावत यांनी बीडमध्ये दाखल झाल्यानंतर दोन दिवसांपूर्वी परळी येथे जावून घटनास्थळाचीपाहणी केली होती. तसेच गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिसांना सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आता बुधवारी त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाची कुठलीही माहिती असल्यास त्यांनी ती पोलिसांनी द्यावी,असे आवाहन पंकज कुमावत यांनी केलं आहे. त्यासाठी कुमावत यांनी त्यांचा व्हाट्सअप नंबर दिला असून ज्याला कुणाला या प्रकरणाची माहिती असेल ती त्यावर द्यावी असेही सांगण्यात आले आहे. सोबतच माहिती

## नवापूरमध्ये एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीला अटक

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक ०७/०८/२०२५): नवापूर शहरात एटीएम फोडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहा जणांच्या टोळीला नवापूर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींमध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.

रात्रीच्या वेळी गस्त घालणाऱ्या पोलिसांना महात्मा गांधी पुतळ्यापाशी असलेल्या एटीएममधून काही संशयित व्यक्ती पळताना दिसल्या. पोलिसांनी पाठलाग केला, पण अंधाराचा फायदा घेऊन आरोपी पळून गेले. घटनास्थळी पाहणी केली असता, एटीएम मशीन खाली पडलेले आढळले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांनी तात्काळ पथकास उच्छल, गुजरात येथे पाठवले. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी उच्छल गावातून सुमितभाई दानियलभाई गामीत (वय १८), जस्टीनकुमार




दिलीपभाई गामीत (वय १८), जतीन मोना गामीत (वय १९) आणि गणेशभाई जिवन गामीत (वय १९) यांच्यासह दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान, आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली हत्यारे आणि दोन मोटरसायकल जप्त केल्या आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## नवजात बालकास सोडून पळणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

**मोलगी । रवींद्र वळवी**

हरणखुरी गावामध्ये एका अज्ञात व्यक्तीने सुमारे दीड महिन्याच्या बालकास सोडून पळ काढल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना ६ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास घडली. हरणखुरी गावातील सरपंच अर्जुन जोरदार पावरा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने बाळाला संतोष फाडा पावरा यांच्या घराच्या कंपाऊंडमध्ये सोडून पलायन केले.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी धडगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, बाळाचा जन्म लपवण्याच्या उद्देशाने हे कृत्य करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (२०१३) च्या कलम ९३ नुसार अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल भिलाजी पाटील करत आहेत.



## मराठवाड्यात ७-८ तर विदर्भात ८-१० ऑगस्ट दरम्यान मुसळधार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-भारतीय हवामान विभागाच्या मुंबई वेधशाळेने दिलेल्या पाच दिवसांच्या हवामान अंदाजानुसार, महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांत मध्यम ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ६ ऑगस्टपासून १० ऑगस्ट पर्यंत कोकण, घाटमाथा, मराठवाडा आणि विदर्भ यामध्ये पावसाचे प्रमाण अधिक असणार आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांना यलो तर काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट दिला गेला आहे. विशेषतः कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पुणे, सातारा घाटमाथा यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.महाराष्ट्रात पुढील पाच दिवस पावसाचा जोर राहणार असून हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलावीत. शेतकरी, विद्यार्थी, वाहनचालक व पर्यटकांनी हवामान अपडेट्सवर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.मराठवाड्यातील लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव याठिकाणी देखील ७ व ८ ऑगस्ट रोजी मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा आहे. विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, अकोला, बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यांमध्ये ८ ते १० ऑगस्ट दरम्यान पावसाचा प्रभाव वाढणार आहे. यामुळे शेतीकामावर परिणाम होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.६ ऑगस्टपासून सुरुवात होणाऱ्या पावसाच्या सत्रात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरसह घाटमाथ्याचे जिल्हे सर्वाधिक प्रभावित होणार आहेत. या भागांमध्ये पावसाचा जोर अधिक असणार असून दरडी कोसळण्याचा धोका वाढू शकतो.

## महसूल सप्ताहाचा तळोदा येथे उत्साहात सांगता समारंभ-वनपट्टा मंजुरीचे आदेश वाटप


**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी तळोदा तहसील कार्यालयात महसूल सप्ताह २०२५ चा सांगता समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला सहायक जिल्हाधिकारी अनय नावंदर, तहसीलदार दिपक धिवरे, सर्व नायब तहसीलदार, महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी, विविध पदाधिकारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.समारंभात वनपट्टा धारकांना मंजुरी आदेशांचे वाटप करण्यात आले. महसूल सप्ताहाच्या निमित्ताने महसूल विभागामार्फत शासनाच्या विविध योजना, उपक्रम व सेवांचे प्रभावी सादरीकरण करत नागरिकांपर्यंत थेट सेवा पोहोचविण्यावर भर देण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामस्तरावर नागरिकांना हक्काच्या सेवा मिळवण्यास मदत झाली असून महसूल विभाग व प्रशासनाने घेतलेल्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.महसूल सप्ताहात महसूल विभागाने विविध शिबिरांचे आयोजन, जनजागृती, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, शासकीय योजना राबविणे आदी उपक्रमांद्वारे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद सशक्त केला आहे.



संपादकीय

# हरवलेलं माणूसपण



स्वामी तुम्ही पाहताय ना! काळ सोकावलायं, माणसातील माणूसपण हरवत चाललयं! देवळाबाहेरच्या परिसरात बसलेल्यांपैकी कोण्या एका दरिद्रीनारायणाचे बोल ऐकून आश्चर्य न वाटलं तर नवल होतं. सामान्यतः भीक मागणाऱ्यांची संख्या विचार करायला लावणारी. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्यांपैकी, देवळाबाहेर, ट्राफिक सिग्नलपाशी भीक मागणाऱ्या दरिद्री नारायणाचे भिक्षापात्र आजन्म रिकामी राहते ते यासाठीचं. पोटाची खळगी, पेटलेला भुकेचा डोंब परमेश्वरालाही जाब विचारल्याशिवाय राहत नाही. दिसामाजी पदरात पडलेलं, एकेका दिसालाही पुरेल की नाही याची शाश्वती कमीचं. मिळवलेल्या अल्प जिन्नसावर, मिळकतीवर कुणा हरामखोराने डल्ला मारावा तर हा विषय जास्तचं त्रासदायक. खरं म्हणजे ज्याच्या त्याच्या ताटातलं खाणारे आपण कोण? एवढीही माणुसकी शाबूत राहिलेली नाही. विवंचनेत पडलेल्या नारायणाची बेचैनी माझं मन मात्र पोखरत गेली. वैयक्तिक स्वार्थाकरिता मनुष्याने सत्याचे केलेले विकृतीकरण हे समाजमन ढासळवणारे आहे. स्वार्थाचा, वासनांचा, अहंकाराचा आणि सुखोपभोगाचा होम पेटला तेव्हा मी नारायणात स्वातंत्र्याचा अंगार फुललेला पाहिला. नि:स्वार्थीपणे चांगल्या सत्कार्यासाठी भीक मागायची लाज का? विचार करायला लावणारी गोष्ट म्हणजे देवळाबाहेरच्या रस्त्यापासून सुरू झालेला माणूसकीचा सामाजिक अध्याय घरादारापर्यंत पोहोचला तरी अनभिज्ञ आहोत आपण. माणूसपण हरवल्याची उदाहरणं आसपास घडतात तेव्हा ती बघण्यापलीकडे आपल्या हाती काही उरत नाही. कारण तो विषय आपल्या घरातला नसतो; परंतु कधीकाळी आपल्या बाबतीत या घटना घडल्या तर मात्र आपले डोळे ताडकन उघडतात. समाजघातक, लाजिरवाणा ठरलेला, विनाशाकडे नेणारा हा मार्ग मानवी संबंधावर भाष्य करणारा आहे.

स्वत:ला प्रामाणिक माणूस बनवा म्हणजे एक लबाड माणूस त्वरित कमी होईल असं थोर विचारवंत थॉमस कालाईल सांगून गेलेत. मनुष्याचा मोठेपणा आपापले काम प्रामाणिकपणे करण्यात आहे. ध्येयसिद्धीचा खरा पाया आणि साधन म्हणजे प्रामाणिकपणा. प्रामाणिकपणे कर्तव्य, कर्म करत राहणं याला जो देवपूजा मानतो, त्याला लबाडीत मिळणारा आनंद अशक्य असतो. प्रामाणिकपणा अस्तित्वातचं नसेल तर त्याला जन्माला घातला पाहिजे. माणूसपण मिळविण्याचा तो एक वैभवशाली मार्ग असू शकेल. प्रामाणिकपणा, कृतज्ञता हे आपण समाजाचं देणं लागतो. भावना आणि आशावाद या कशातही न गुरफटलेले मूल्यमापन म्हणजे प्रामाणिकपणा होय; परंतु थॉमस यांच्या मते प्रामाणिकपणाचा मापदंड विसाव्या शतकापासून ढासळलेला दिसतो. विषयाचा दोन्ही बाजूने विचार करता प्रथम माणूसकी जपणारी माणसं विचारात घ्यायला हवीत. अशी माणसं लाखात एक असतात, जी हिऱ्याप्रमाणे चमकतात. तरी माणूसपण हरवल्याची दखलपात्र उदाहरणं आपल्या अवतीभवती सर्रास दिसून येतात. यामध्ये विवेकनिष्ठ दुर्गतीचा रस्ता मोठा असतो. याला बरीच कारणं आहेत. जागतिकीकरणाच्या बदललेल्या व्याख्या, यांत्रिकीकरण, सत्तालोलुपता. भरीस भर म्हणून लोकसंख्यावाढ, सुख, युद्ध, बेकारी, उपासमार या गोष्टी मानवाला बदल करण्यास भाग पाडत आहेत. कोण्याकाळी मनुष्याची श्रीमंती म्हणजे त्याचं उत्तम चारित्र्य होत. पण आजचं चित्र वेगळं आहे.

नव्या जमान्यातील बदललेले वारे, हव्यास, धनलालसा, नेहमीच दिसत असलेले दुसऱ्याचे दोष, कामाची निष्क्रियता यात आपण गुंतत चाललो आहोत. जे आहे ते माझं अन् माझ्यापुरताचं असं मानून सदसद्विवेकबुद्धीचा ऱ्हास करून घेतलेले आपल्यासारखे आपण पुढच्या पिढीला वाईट विचारांच्या पोथी सुपूर्त करत आहोत. एखाद्या नात्यामध्ये निर्माण झालेली तेढ, अहंकार, भौतिक सोयी सुविधांचा हव्यास, सुखलोलुपतेची चटक, कोटी कोटी हातांच्या मुठीत म्हटल तर सगळं आहे. आपल्या जीवनाचं सार सांगणारी ही मूठ ढिली पडली, तर नाती नुसती चव्हाट्यावर येणार नाहीत, तर भावनिक विध्वंसास कारणीभूत ठरतील. अंत:करणातील नम्रता विसरल्याने डोळे असूनसुद्धा आपणास अंधत्व आले आहे. आपल्या मनाला इतरांचा विचार शिवत नाही. मदतीचा हात पुढे येत नाही कुणास. वाईट गोष्टींच्या आहारी गेलेला महत्त्वाकांक्षेचा राक्षस आपल्या डोक्यावर नाचतोय. यायोगे कर्म, धर्म, गीतासार, संस्कार, आचार, विचार मागे पडत चालले आहेत. अवजड यंत्रापेक्षा मानवीय भाव भावनांचा सहज स्पर्श माणुसकीला बांधून ठेऊ शकतो हे सत्य स्वीकारलं नाही, तर कुणी कुणाचं उरणार नाही असं भयंकर वादळ दाराशी घोंघावेल, ज्यायोगे मानव जातीला पुढे जाऊन भयंकर परिणामांना तोंड द्यावे लागेल.

# मराठवाड्यात रेल्वे प्रकल्प सुपरफास्ट




व्यापारासाठी लागणाऱ्या मालाची ने-आण करण्यासाठी जवळचा मार्ग तयार होईल. तसे पाहिले तर मराठवाड्याच्या या मागण्या गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरू आहेत; परंतु २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर मराठवाड्याच्या रेल्वेविषयक विकासाला अधिक चालना मिळाली.भाजपच्या काळात मराठवाड्याला रेल्वे प्रकल्पांच्या बाबतीत भरभरून प्रतिसाद व सहकार्य मिळत आहे. भाजपने दुर्लक्षित मराठवाड्याकडे व प्रलंबित रेल्वे प्रकल्पांच्या बाबतीत विशेष लक्ष घालून येथील अनेक प्रश्न मार्गी लावले. भाजपकडून रेल्वेच्या बाबतीत मराठवाड्यासाठी पुन्हा एक आनंदवार्ता आली. परभणी ते छ. संभाजीनगर रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी मिळाली आहे. १७७.२९ कि.मी.च्या रेल्वेमार्गासाठी २ हजार १७९ कोटींचा निधीही मंजूर करण्यात आला. अंकाई (मनमाड) ते छ. संभाजीनगर दरम्यान रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. केंद्र सरकारने छ. संभाजीनगर-परभणी दरम्यानच्या दुहेरीकरणाला मंजुरी दिल्याने मराठवाड्यासाठी उत्तर व दक्षिण भारताला जोडणारा जवळचा व वेगवान मार्ग तयार होणार आहे. आगामी तीन वर्षांत मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात प्रवासी व मालवाहतूक यामुळे वाढणार आहे. याबरोबरच तब्बल ७२.३४ कोटी रुपये खर्चून होणाऱ्या ३.२२ किलोमीटर अंतराच्या पूर्णा बायपास लाईनचा प्रकल्प मराठवाड्यातील रेल्वे वाहतूक आणि प्रादेशिक विकासासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. पूर्णा येथे होणाऱ्या नवीन स्टेशनवरही रेल्वे थांबणार आहेत. यामुळे पूर्ण शहर आणि जवळच्या गावांमधील प्रवाशांना लांब पल्ल्यांच्या रेल्वेमध्ये प्रवेश मिळणार आहे. रेल्वे बोर्डाने पूर्णा जंक्शनवरच एक नवीन बायपास बांधण्याचा निर्णय घेतला. तसेच स्टेशनजवळ एक नवीन पूर्णा रेल्वे स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे हे एक रेल्वेचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल. मराठवाड्याच्या दृष्टीने पूर्णा रेल्वे स्टेशन अधिक गतिमान व रेल्वे ऑपरेशन्ससाठी महत्त्वाचे स्थान ठरणार आहे.

छ. संभाजीनगर ते परभणी दरम्यानच्या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला जेवढ्या लवकर पूर्ण करता येईल, तेवढ्या लवकर तो मार्ग पूर्ण होणे आवश्यक आहे. मराठवाड्यात मुदखेड ते परभणी या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासोबतच परभणी ते छ. संभाजीनगर या रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण चार वर्षांपूर्वीच होणे आवश्यक होते. तसे झाले असते तर चार वर्षांपूर्वीच कदाचित हे काम पूर्ण झाले असते. असो. 'देर आये दुरुस्त आये' या म्हणीप्रमाणे मराठवाड्याच्या दुहेरीकरणाचा हा प्रश्न एकदाचा मार्गी लागला. तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यामुळेच हा प्रश्न पूर्णपणे निकाली निघाला आहे. प्रत्यक्षात छ. संभाजीनगर ते मुदखेड हे अंतर ३०० कि.मी.पेक्षा जास्त असल्यामुळे एकाच टप्प्यात या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा प्रश्न मार्गी लागू शकला नाही. त्यामुळे त्यांनी मंत्रीपदावर असताना अंकाई ते परभणी या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी कामाचे दोन टप्पे पाडले. त्यानंतरच या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा प्रश्न मार्गी लागला. मराठवाड्याच्या दृष्टीने हा एक मोठा टप्पा पार पडणार आहे. यासाठी ज्यांनी-ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे मराठवाड्यात कौतुक होत आहे. विशेषतः तत्कालीन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यामुळेच मराठवाड्याला अच्छे दिन आले, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. आता छ. संभाजीनगर ते अहिल्यानगर या रेल्वेमार्गाच्या कामाला गती देणे आवश्यक आहे. हा मार्ग पुण्याला जाण्यासाठी अगदी सोयीस्कर व जवळचा मार्ग ठरणार आहे. मराठवाड्यातील नांदेड, परभणी या दोन जिल्ह्यांतील नागरिकांना हा अतिशय जवळचा मार्ग ठरू शकतो.

याबरोबरच वर्धा-नांदेड या रेल्वेमार्गाचे काम विदर्भाच्या भागातून पूर्ण होत आले आहे. मराठवाड्यातील हदगावपर्यंत हे काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने तातडीने पाऊल उचलणे गरजेचे आहे. बीड-अहिल्यानगर रेल्वेमार्गही अंतिम टप्प्यात आहे. या वर्षाच्या अखेरपर्यंत मराठवाड्यातून विदर्भ, उत्तर भारत, दक्षिण भारताला जोडणारे चांगले रेल्वेमार्ग पूर्णत्वाकडे जात आहेत. लवकरात लवकर या मार्गांवरून रेल्वे धावली तर मराठवाड्याच्या विकासाला अधिक चालना मिळणार आहे. केवळ रेल्वेतील प्रवाशांसाठी हा मार्ग सोयीचा ठरणार नसून या मार्गावरून उद्योग, व्यापारासाठी लागणाऱ्या मालाची ने-आण करण्यासाठी जवळचा मार्ग तयार होईल. तसे पाहिले तर मराठवाड्याच्या या मागण्या गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरू आहेत; परंतु २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर मराठवाड्याच्या रेल्वेविषयक विकासाला अधिक चालना मिळाली. त्यानंतर राज्यात भाजपच्या नेतृत्वाने मराठवाड्याच्या विकासाला झुकते माप दिले. मराठवाड्याचे ज्येष्ठ रेल्वे आंदोलक स्व. सुधाकरराव डोईफोडे यांनी या सर्व प्रलंबित रेल्वे प्रश्नांच्या मागण्यांसाठी वारंवार आवाज उठवला होता. मराठवाडा व शेजारी असलेल्या तेलंगणा व कर्नाटकातील खासदार व राजकारणी मंडळींकडे अनेकदा यासाठी पाठपुरावा केला. केवळ एवढ्यावरच न थांबता थेट दिल्ली रेल्वेबोर्ड गाठत त्यांनी याबाबत अनेक मागण्या लावून धरल्या. आज मराठवाडा रेल्वे प्रश्नांच्या बाबतीत हळूहळू का होईना कात टाकत आहे. मराठवाड्यातील सर्वच रेल्वे प्रश्न सुटलेले आहेत, असे नसून अजूनही जे प्रलंबित मार्ग आहेत, त्यासाठी मराठवाड्यातील नेतृत्वाला प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांनी आदिलाबाद-माहूर-वाशिम या नवीन रेल्वे मार्गाच्या प्रस्तावासाठी शासनाकडे तसेच रेल्वे बोर्डाकडे सातत्याने पाठपुरावा केला. पोहरादेवी ते माहूरची रेणुका देवी या दोन भक्ती स्थळांना जोडण्याची तरतूद महाराष्ट्र शासनाकडून निधीद्वारे मंजूर करून घेतली. तसेच हा मार्ग पूर्ण व्हावा यासाठी ते गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न करत आहेत. याबरोबरच वर्धा-नांदेड या मार्गासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठीही त्यांनी रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा केला. नांदेड-पुणे वंदे भारत सुरू व्हावी अशी मागणी त्यांनी यापूर्वीच केलेली आहे. तसेच हिंगोली-मुंबई या सुपरफास्ट रेल्वेसाठी ही त्यांचे प्रयत्न सार्थक ठरलेले आहेत. नांदेड-देगलूर-बिदर हा रेल्वेमार्ग जोपर्यत पूर्ण होणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्र व कर्नाटक यासाठी जवळचा मार्ग तयार होणार नाही.

महाराष्ट्राने स्वतःच्या वाट्याचा खर्च भरण्याची तयारी दाखवून अर्थसंकल्पात तशी तरतूदही केली आहे. आता कर्नाटकने त्यांच्या वाट्याचा खर्च देण्याची तयारी दाखवणे व तसे केंद्राला कळविणे आवश्यक आहे. याबरोबरच तेलंगणातील बोधन-ते महाराष्ट्रातील सीमेवर असलेल्या बिलोली रेल्वेमार्ग तयार करण्याचा प्रश्न रेल्वे बोर्डाकडे फाईलबंद झाला आहे. तो प्रश्न उचलून धरणे आवश्यक आहे. बिलोली हा भाग मराठवाड्याचा एक कोपरा आहे. तेथून तेलंगणाची सीमा सुरू होते. त्यामुळे या भागाच्या विकासाकडे राजकारणी व राज्य शासनाचे नेहमीच दुर्लक्ष झालेले आहे. या भागाच्या विकासाला चालना देण्याच्यादृष्टीने तेथे रेल्वेमार्ग विकसीत करणे अत्यंत आवश्यक आहे. नांदेड-पूणे वंदे भारत लवकरात लवकर सोईच्या वेळेत सुरू करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे आता स्लीपर वंदे भारत सुरू करत असताना मराठवाड्यासाठी नांदेड-पूणे या नवीन वंदे भारतची मागणी लावून धरणे आवश्यक आहे. यासाठी मराठवाड्यातील खासदारांनी वज्रमूठ बांधावी, अशी तमाम मराठवाड्यातील लाखो नागरिकांची अपेक्षा आहे. एकंदरीत भाजपच्या काळातच मराठवाड्यातील रेल्वे प्रश्न अधिक तीव्रतेने मार्गी लागले आहेत. उर्वरित प्रश्नही भाजपच्या पुढाऱ्यांनी पाठपुरावा करून पूर्ण करून घ्यावेत, अशी मागणी मराठवाड्यातील जनतेची आहे.

# भारत-अमेरिका दुराव्याचा पाकला फायदा?

भारत आणि अमेरिकेत सध्या दुरावा आहे. भारताला शह देण्यासाठी अमेरिकेने आता पुन्हा पाकिस्तानला जवळ करण्याचे ठरवले आहे. जागतिक सत्ता संतुलनाच्या समीकरणात त्यामुळे बदल होण्याची शक्यता आहे. अमेरिका पाकिस्तानला जशी जवळ घेईल, तसा पाकिस्तानपासून चीन दुरावण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भारतावर त्याचा काय परिणाम होईल, हे जाणून घेतले पाहिजे.२०१९ मध्ये अमेरिकेतील टेक्सास येथे झालेल्या 'हाउडी मोदी' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात 'अबकी बार ट्रम्प सरकार'चा नारा दिला. पुढच्या वर्षी ट्रम्प भारतात आले, तेव्हा अहमदाबादमध्ये त्यांच्या स्वागतासाठी 'नमस्ते ट्रम्प' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ट्रम्प आणि मोदी यांची वैचारिक नाळ जुळली आहे, दोघे परस्परांचे मित्र आहेत, असे चित्र जगभर रंगवले गेले. २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेत आले, तर ट्रम्प हेही चार वर्षांनंतर पुन्हा सत्तेत आले. माध्यमांनी पुन्हा दोन्ही नेत्यांमधील संबंधांच्या दृष्टिकोनातून भारत-अमेरिका संबंधांकडे पाहण्यास सुरुवात केली; परंतु गेल्या सुमारे सहा महिन्यांमध्ये असे दिसते की, दोन्ही नेत्यांमधील संबंध पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क म्हणजेच व्यापार शुल्क लादण्याची घोषणा केली. त्यात त्यांचा भारतावर अधिक रोष आहे. भारत जगात सर्वाधिक आयात शुल्क आकारतो, असा आरोप त्यांनी वारंवार केला आहे.

अमेरिकेने भारताला रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र खरेदी करू नका, असे सांगितले होते; परंतु भारताने अमेरिकेला न जुमानता रशियाकडून ही क्षेपणास्त्रे खरेदी केली. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिका आणि 'नाटो'ने रशियावर अनेक निर्बंध लादले. हे निर्बंध धुडकावून भारत आणि चीनने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी सुरू केली. भारताला रशियातून स्वस्तात कच्चे तेल मिळते. भारतीय कंपन्यांनी रशियातून कच्चे तेल खरेदी करून, त्यावर प्रक्रिया करून जगातील अनेक देशांना विकले. यामुळे अमेरिकेचा तिळपापड झाला आहे. रशिया आणि अमेरिकेत सध्या तणावाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवरही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे सुरूच ठेवले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतरही भारताने रशियाशी मैत्रीसंबंध पूर्वीसारखेच राहतील, असे जाहीर केल्यामुळे ट्रम्प यांचे पित्त खवळले. याच वळणावर अमेरिकेने पाकिस्तानसोबत तेलाचे साठे विकसित करण्यावर करार केला. अर्थात पाकिस्तानला ते इतक्या सहजासहजी करता येणार नाही. त्याचे कारण हे साठे बलुचिस्तान प्रांतात आहेत आणि तिथे आता बंडखोरांची सत्ता चालते. अमेरिका आणि पाकिस्तानच्या करारानंतर बलुचिस्तानमधून या कराराविरोधात भाष्य व्हायला लागले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर लादल्यामुळे अल्पकालीन काळात निर्यात निश्चितच कमी होईल. निर्यातदारांचे उत्पन्नही कमी होईल. त्याचा दीर्घकालीन परिणाम अधिक महत्त्वाचा आहे, कारण जर हे शुल्क एका वर्षापेक्षा जास्त काळ असेच राहिले, तर पुरवठा साखळीत बदल होऊ शकतो. पहलगाम हल्ल्यानंतर ट्रम्प यांनी आगाऊपणा केला. 'ऑपरेशन सिंदूर' आपणच थांबवायला भाग पाडले, असे त्यांनी वारंवार सांगितले. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलित आले. विरोधकांनी प्रश्न उपस्थित केला, की तुम्ही द्विपक्षीय बाबींमध्ये अमेरिकेचा हस्तक्षेप कसा होऊ दिला? विशेषतः संरक्षण बाबींमध्ये नेहमीच कठोर भूमिका घेणाऱ्या भाजपला बॅकफूटवर



जावे लागले. पंतप्रधानांना संसदेत स्पष्टीकरण द्यावे लागले. अमेरिकेला भारताकडून हवे आहे, ते भारत देऊ शकत नाही. ट्रम्प यांना वाटते की अमेरिकेच्या कृषी उत्पादनांसाठी भारताने दरवाजे खुले केले पाहिजेत. भारताने या उत्पादनांवर आधीच कर लादून भारतीय शेती क्षेत्र संरक्षित केले आहे. याशिवाय मांसभक्षक अमेरिकन गाईंचे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ भारतात येऊ द्यायला अनेकांचा विरोध आहे. हा प्रश्न भावनिक झाला असून अमेरिकेशी असणाऱ्या मैत्रीसाठी भाजप आपली मतपेढी दुखावू शकत नाही.

ट्रम्प यांचा झालेला सत्कार, त्यांना मिळालेली वागणूक यामुळे त्यांचा असा समज झाला की आपण म्हणू ते मोदी करतील; परंतु तसे झाले नाही. त्यामुळे त्यांचे पित्त खवळले. ट्रम्प यांनी ज्या प्रकारे भारतावर शुल्क लादले आहे आणि रशियाकडून तेल आणि संरक्षण उपकरणे खरेदी केल्याबद्दल दंड लावला आहे, तो एक प्रकारे आपल्या सार्वभौमत्वावर हल्ला आहे. आपण कुठून काय खरेदी करावे हे अमेरिका कसे सांगू शकते? इराणसोबत व्यवसाय केल्याबद्दलही अमेरिकेने सहा भारतीय कंपन्यांवर बंदी घातली आहे. एकीकडे भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये कटुता येत असताना अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये तेलाच्या साठ्यांबाबत करार झाला. दोन्ही देशांमधील व्यापार कराराचीही चर्चा झाली. पाकिस्तानमध्ये या कराराचे स्वागत केले गेले आहे. त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक अतिशय महत्त्वाचा करार आहे. अमेरिका आणि इतर देशांसोबतच्या राजनैतिक संबंधांसाठीही हा एक मोठा विजय मानला जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानची अर्थव्यवस्था खूप वाईट परिस्थितीतून गेली आहे आणि आता सरकार दावा करत आहे की ती 'टेकऑफ पोझिशन'वर आली आहे. या प्रसंगी पाकिस्तानी निर्यातीला चालना मिळाली, तर पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळेल. गेल्या २० वर्षांपासून किंवा त्याहूनही अधिक काळ पाकिस्तान सरकार विविध खासगी कंपन्या आणि देशांना तेलाच्या साठ्यावर किंवा वायूच्या साठ्यावर काम करण्यासाठी आवाहन करत होते; परंतु सुरक्षेच्या कारणास्तव आणि तंत्रज्ञानामुळे किंवा इतर कारणांमुळे कंपन्या येत नव्हत्या. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी पाकिस्तानला आश्वस्त केले आहे.एखादी मोठी अमेरिकन कंपनी त्यांच्या तंत्रज्ञानासह आली, तर ती त्यांच्याकडे असलेल्या तेल आणि वायूच्या साठ्यांचा शोध घेण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल. याचा अर्थ असा, की गेल्या वीस वर्षांपासून पाकिस्तान सामना करत असलेले ऊर्जा संकट सोडवण्यास मदत होईल. पाकिस्तान सरकार हा आपला राजनैतिक विजय म्हणूनही साजरा करत आहे. दरम्यान, अधिक शुल्क लादण्यात आल्याचा फटका भारतीय वस्त्रोद्योगासह अन्य उद्योगांना बसणार आहे. त्याचा फायदा पाकिस्तान आणि बांगलादेशमधील कापड उद्योगाला होईल. पाकिस्तानच्या निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा ऐंशी टक्के आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताचा विजय झाला असला, तरी पाकिस्तान मात्र आपलाच विजय झाल्याचा दावा करतो. आता तर त्याने राजनैतिक आघाडीवरही भारताचा पराभव केला आहे, असे सांगायला सुरुवात केली आहे. भारताची विमाने पाडल्याचे सांगत ट्रम्प यांनी पाकिस्तानची तळी उचलून धरली. अमेरिकेत सरकारी तेल कंपन्या नाहीत. तिथल्या सर्व कंपन्या खासगी आहेत, मग कोणत्या कंपनीने हा करार केला आणि कधी केला, असा प्रश्न उपस्थित केला जातो. अमेरिका आणि पाकिस्तान जगाच्या डोळ्यांत धूळफेक करत असल्याचा सूर तज्ज्ञांनी लावला आहे. कोणत्याही कंपनीने कोणताही करार केलेला नाही. ट्रम्प काहीही बोलतील आणि कंपन्या पाकिस्तानात येतील, असे अजिबात घडणार नाही. अमेरिकन सरकार पाकिस्तानमध्ये जाऊन काम करण्याचा आपला हेतू व्यक्त करू शकते; पण कंपन्या सुरक्षित वातावरण असतील तरच जातील. बलुचिस्तानमध्ये काम करणे किती अवघड आहे, याचा अनुभव चिनी कंपन्यांना आला आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकन कंपन्या हे कच्च्या तेलाच्या संशोधनासाठी बलुचिस्तानमध्ये कितपत येतील, याबाबत साशंकता आहे. पाकिस्तान काही काळापासून म्हणत आहे की त्यांच्याकडे गॅस आणि तेलाचे मोठे साठे आहेत. म्यानमार आणि बांगलादेश अनेक वर्षांपासून म्हणत आहेत, की त्यांच्याकडे मोठे साठे आहेत; परंतु आंतरराष्ट्रीय कंपन्या ते प्रमाणित करेपर्यंत हे साठे वैध नाही. या कंपन्या वैज्ञानिक आधारावर ते प्रमाणित करतात आणि संपूर्ण जग तो डेटा पाहू शकते. अजून असे काहीही घडलेले नाही.

# वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान; शेतकरी पुत्र खा.सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न

## हरीण, रानडुकरांनी नुकसान केल्यास भरपाई का नाही? ;शेतकऱ्यांच्या आवाज दिल्लीत पोहचविला

### अशा आहेत महत्वाच्या मागण्या

**महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी. हा पर्याय लागू झाल्या नंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील. तसेच,केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण,भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांना ही अधिक बळकटी द्यावी.**

### मुख्यमंत्र्यांकडेही केली मागणी

**केंद्रशासनाच्या निर्णया मुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती आर्थिक सुरक्षा मिळेल आणि शेतीसंबंधी टाळता येणाऱ्या धोका घटकां पासून संरक्षण मिळेल, मात्र महाराष्ट्र राज्यातील सर्वदूर भागामधे रानडुक्कर,हरिणे तसेच इतर जंगली प्राणी याचा शेतास होत असलेल्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त आहेत.त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधे केंद्र शासना च्या निर्देशानुसार ड-ऑन कव्हरमधे रानडुक्करे,हरिणे व इतर जंगली प्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीचा समावेश करावा व अशाभागामधे शेतीला कुंपण घालून हा उपद्रव रोकण्यासाठी उपाययोजना करव्यात यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना खा.बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन मागणी केली आहे.**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्या तील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते.ही चिंतेची बाब आहे.हा उपद्रव रोखण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे.नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही.इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही? असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोखण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरी पुत्र म्हणून खा.सोनवणे यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत.



कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे,पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे उपाय योजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता.पर्यावरण,वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंती नंतर,राज्य सरकारांना या नुकसानीचा 'ड-ऑन कव्हर' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तथापि,महाराष्ट्र सरकार ने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच केंद्र सरकार कडून 'डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स', 'प्रोजेक्ट टायगर' आणि 'प्रोजेक्ट एलिफंट' या योजने अंतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते.यामध्ये काटेरी तारांचे कुंपण,सोलार ऊर्जेवर चालणारे कुंपण,कॅक्टसची जिवंत फेन्सिंग,भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे.बीड जिल्ह्यात हरीण,रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे.शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी,शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली आहे.



## अलिबाग तालुक्यात युरिया खताची तीव्र टंचाई

# शेतकऱ्यांची वाढती चिंता, प्रशासना कडे शिवसेना व मनसेची मागणी

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात सध्या युरिया खताची भीषण टंचाई निर्माण झाली असून, अनेक शेतकरी खरीप हंगामाच्या संवेदनशील टप्प्यावर अडचणीत सापडले आहेत. वेळेवर खत न मिळाल्यामुळे पेरणीच्या पुढील प्रक्रियेला विलंब होत असून, यामुळे उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची आणि आर्थिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.



तालुक्यातील ताडवणळे, श्रीगाव, कुटुंबळे, पिटकीरी, रावेत, कुडूस, आंबेगाव, पेशारी, चरी, कोपर, कमळे, शाहापूर, शहाबाज आदी गावांमधील शेतकरी युरिया मिळवण्यासाठी खत दुकाने आणि सहकारी संस्थांच्या फेऱ्या करत आहेत. मात्र, खत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आणि संतापाचे वातावरण दिसून येत आहे. शेतकरी म्हणतात, बियाणं पेरून सुद्धा खतअभावी पुढील प्रक्रिया थांबली आहे. जर अशीच अवस्था राहिली, तर कर्जबाजारी व्हायची वेळ येईल.

या पार्श्वभूमीवर ४ ऑगस्ट २०२५ रोजीशिवसेना रायगड जिल्हाप्रमुख राजा केणीयांनी जिल्हा कृषी अधिकारी यांना लेखी निवेदन देत तातडीने युरिया खताचा पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे. त्यांनी नमूद केले की, गेल्या महिनाभरापासून खताची उपलब्धता नसल्यामुळे तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, म्हणून प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात.त्याच दिवशीमहाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्याही शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकारी संदेश शिर्केयांची भेट घेऊन युरिया टंचाईच्या प्रश्नी तक्रार केली. शिर्के यांनी तत्काळ जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानंतर मनसेच्या प्रतिनिधींनी शिंदे यांच्याही कार्यालयात भेट देऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर खत उपलब्ध व्हावे, यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी केली.


या शिष्टमंडळातदेवव्रत विष्णू पाटील,सिद्धू म्हात्रे(तालुका अध्यक्ष),गोरखनाथ पाटील(ग्राहक परिषद), वरामकृष्ण पाटील(शेतकरी, मानकुळे) सहभागी होते.शेतकऱ्यांवरील अडचण ओळखून प्रशासनाने तात्काळ योग्य ती पावले उचलावीत, अन्यथा आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशाराही शेतकरी संघटनांकडून देण्यात आला आहे.

संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी प्रशासन उभं राहील का, की युरियाविना नांगर थांबेल?हा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात घोंगावत आहे.

## गझलनवाज भीमराव पांचाळे यांचा लता मंगेशकर पुरस्काराने गौरव

**मुंबई । प्रतिनिधी**

मंगळवारी झालेल्या कार्यक्रमात ६० आणि ६१ वे राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आले. गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार भीमराव पांचाळे यांनी देण्यात आला. तसेच महेश मांजरेकर यांचा चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार (२०२४) देऊन गौरव करण्यात आली.गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार - भीमराव पांचाळे चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार (२०२४) - प्रसिध्द दिग्दर्शक, अभिनेते महेश मांजरेकर चित्रपती कै. व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार - अभिनेत्री मुक्ता बर्वे स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार (२०२४) - ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार - अभिनेत्री काजोल गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्याबद्दल बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'भीमराव पांचाळे यांच्या गझलांनी गेली ५० वर्ष सर्वांवर मोहिनी घातली आहे. अमरावती जिल्ह्याने आपल्याला दोन हिरे दिले आहेत. एक भीमराव पांचाळे आणि दुसरे म्हणजे सुरेश भट. या जोडीने गझलांना वेगळी उंची दिली. मराठीतील गझलांमध्ये भीमराव पांचाळे आणि सुरेश भट यांचा कोई मुकाबला नही. कित्येक देशांमध्ये त्यांनी गझला नेल्या. वर्ध्याच्या स्मशानातही त्यांनी कार्यक्रम केला असं फडणवीसांनी म्हटलं.पुढे बोलताना मुख्यमंत्री



म्हणाले की, 'अनुमप खेर यांना आपण पुरस्कार दिला. त्याच्याबद्दल काही सांगण्याची गरज नाही. अतिशय सुंदरपणे ते भूमिका साकारत असतात. हास्यकलाकाराची भूमिका असेल किंवा संवेदनशील भूमिका असेल त्यांनी सर्व प्रकारच्या भूमिका सुंदरपणे साकारल्या आहेत.' काजोलबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, 'काजोल यांनी ३० वर्षांपूर्वी हिंदी चित्रपटामध्ये कारकीर्द सुरु केली. त्यानंतर सातत्याने त्यांच्या भूमिकेने प्रेक्षकांना भूरळ पाडली. आजही समर्थपणे त्या सिनेमामध्ये भूमिका पार पाडत आहेत.'

## सोशल मिडीयावर बाबासाहेबांविषयी आक्षेपार्ह पोस्ट टाकणा-यांना नेहरू नगर पोलीसांकडून अटक

**मुंबई । प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच मुस्लीम धर्मा विषयी सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकून कायदा व सुव्यवस्था बिघडवू पाहणा-या राज्याबाहेरील दोन आरोपींना नैहरू नगर पोलीसांनी बेड्या ठोकल्या असून न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे.दरम्यान झालेल्या या केरवाईबद्दल भीम आर्मीने पोलीसांचे अभिनंदन केले आहे. परभणी येथील भन्ते सारीपुत्त यांनी जात बौध्द, धर्म बौध्द लिहा हा वॉट्सअप ग्रूप तयार केला होता .सदर ग्रूपची लिंक त्यांनी सोशलमिडीयावर शेअर केली असता,या लिंकचा आधार घेत संतोषकुमार संगम वय ४३ झारखंड,अंकीत वर्मा वय १८ मध्य प्रदेश व नरेंद्र परायण सिंग वय ४० बिहार, हे तिघे या ग्रूपवर सहभागी झाले . सदर ईसमांनी या ग्रूपवर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच मुस्लीम धर्माविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेल्या पोस्ट शेअर केल्या होत्या.सदर आक्षेपार्ह पोस्टबाबत भीम आर्मी या संघटनेचे कार्यकर्ते सुनील वाकोडे यांनी स्थानिक नेहरू



नगर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार करीत आरोपींवर कडक कारवाईची मागणी केली होती.त्यानुसार आरोपींविरोधात गु.र.क्र.४३८ड़२०२०. भादंवि ५०५(२),१५३(अ,ब)व २९५(अ) नुसार गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान नेहरूनगर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अंकुश खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राजेंद्र ठीकेकर यांनी या प्रकरणी कसोशीने तपास केला असता सिम कार्ड आणि मोबाईल बदलत, पोलीसांना सतत हुलकावणी देणा-या संतोषकुमार संगम व अंकीत वर्मा या दोन आरोपींना अटक केली.यातील तिसरा आरोपी नरेंद्र परायन सिंग हा मृत झाला असल्याचे पोलीसांनी सांगितले. दरम्यान पोलीसांनी केलेल्या कारवाई नंतर पोलीस निरीक्षक राजेंद्र ठीकेकर यांचे भीम आर्मीचे मुंबई अध्यक्ष अविनाश गरूड ,चेंबूर तालुका अध्यक्ष प्रवीण भोसले,सुनील वाकोडे संजय बचाटे यांनी भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. धर्माधर्मात तेढ निर्माण करणा-यांविरोधात कारवाई झाली तरच असल्या समाजविघातक प्रवृत्तींना आळा बसू शकेल असे गरूड यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# शिरवणे ग्रामस्थांनी नेरूळ येथे महावितरण अधिकाऱ्यांची घेतली भेट

## विना परवानगी स्मार्ट मीटर जोडणी प्रकरणावर संतप्त प्रतिक्रिया

**मुंबई । प्रतिनिधी**

शिरवणे गावातील ग्रामस्थांनी नेरूळ येथील महावितरण (MSEB) कार्यालयात भेट देत, विना परवानगी स्मार्ट मीटर लावण्याच्या मनमानी कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आणि रमेश कावळे अतिरिक्त कार्यकारी अभियंता नेरूळ पामबीच विभाग यांची भेट घेऊन निवेदन दिले. महावितरणकडून कोणतीही पूर्वसूचना न देता जुन्या मीटरमध्ये बिघाड असल्याचे कारण सांगून जबरदस्तीने नवीन स्मार्ट मीटर बसवले जात असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे.

या प्रकरणी नागरिकांना कोणतीही माहिती न देता त्यांच्या घरी स्मार्ट मीटरची जोडणी केली जात असून, काही प्रकरणांमध्ये चुकीचे बिल व विजेचा अचूक हिशोब न लागण्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थांत संतापाचे वातावरण पसरले आहे.



महावितरण अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात शिरवणे ग्रामस्थांनी हा प्रकार तात्काळ थांबवावा, आणि स्मार्ट मीटर बसवण्यापूर्वी नागरिकांची स्पष्ट संमती व योग्य लेखी परवानगी घेण्यात यावी, अशी मागणी केली.या भेटीवेळी संतोष सुतार, रोहिणी भोईर, प्रभाकर ठाकूर, नरेश सुतार, अविनाश सुतार, दीपेश पाटील, अरुण पाटील, अजय भोईर आणि प्रल्हाद म्हात्रे आणि शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामस्थांच्या या पावलामुळे महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अपेक्षित आहे.

# मराठवाड्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ३ हजार रुग्णांना २५ कोटी रुपयांची मदत

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष दिलासा दायक ठरला असून या कक्षाद्वारे जानेवारी ते जून या कालावधीत तब्बल ३ हजार रुग्णांना २५.५८ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. या शिवाय जिल्हास्तरावर आयोजित शिबिराचा १२ हजार रुग्णांना लाभ मिळाला असून यामध्ये सर्वाधिक ३ हजार ६२५ रुग्ण हिंगोली जिल्ह्यातील आहेत.राज्यात गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून औषधोपचारासाठी आर्थिक मदत केली जाते. याशिवाय जिल्हास्तरावर आरोग्य शिबीरे आयोजित करून या शिबिराच्या माध्यमातून रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार केले जातात. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षात दाखल होणाऱ्या प्रस्तावाची शासनाकडे माहिती सादर केल्यानंतर रुग्णांना मदत केली जाते.यामध्ये मराठवाड्यात जानेवारी ते जून या कालावधीत ३ हजार रुग्णांना २५.५८ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६३३ रुग्णांना ५.३३ कोटी, बीड ६१० रुग्णांना ४.८९ कोटी, परभणी ५३३ रुग्णांना ४.६७ कोटी, लातूर ३८५ रुग्णांना ३.३९ कोटी, जालना ३६७ रुग्णांना ३.११ कोटी, नांदेड ३२३ रुग्णांना २.८० कोटी, धाराशिव २५७ रुग्णांना २.२१ कोटी तर हिंगोली जिल्हयातील १३२ रुग्णांना १.१६ कोटी रुपयांची वैद्यकिय मदत करण्यात आली आहे.दरम्यान, मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमधून आयोजित आरोग्य शिबीराचा १२ हजार रुग्णांना लाभ घेतला असून यामध्ये सर्वाधिक हिंगोली जिल्ह्यातील ३६२५ रुग्णांचा समावेश आहे. त्या पाठोपाठ छत्रपती संभाजीनगर ३०५८, लातुर २५२२, बीड ११००, परभणी ७६३, धाराशिव ७४२, जालना ३७३, नांदेड जिल्ह्यातील २२६ रुग्णांचा समावेश आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून २० गंभीर आजारासाठी मदत दिली जात असून यामध्ये प्रामुख्याने हृदयविकार, किडणी, लिव्हर, बोनमॅरो प्रत्यारोपन, कर्करोग, अपघात, नवजात बालकांचे आजार, मेंदू विकार, डायलिसिस, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघातातील रुग्णांचा समावेश आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत उपचार शक्य नसतील तर त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडे मदत मागता येते.

# केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर

## खा.बजरंग सोनवणे यांचे प्रयत्न फळाला, केजला दिले झुकते माप

**बीड | प्रतिनिधी**

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारती मंजुर करण्यात आलेल्या असून नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यात येणार आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला असून आता या पाठपुराव्यामुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे.केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीत राबविली आहे. सदर योजनेचा मुळ ढाचा न बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना ग्रामविकास विभागाच्या निर्णयान्वये लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०टक्के व राज्य हिस्सा ४०टक्के असे आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेसाठी वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींकरीता नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास मंजूर करण्यात आले आहे. यात केज तालुक्याला झुकते माप दिले असून २८ पैकी ४ इमारती या केज तालुक्यातील आहेत.




### केंद्राकडे पाठविले प्रस्ताव

उद्दिष्टाच्या अधीन राहून ज्या ग्रामपंचायतींची लोक संख्या ३००० पेक्षा अधिक आहे आणि त्यांना स्वमालकीची ग्रामपंचायत इमारत नाही, अथवा धोकादायक व मोडकळीस आलेली आहे, अशा ग्रा.पं.चे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिल्या होत्या.

### या ग्रामपंचायतींचा समावेश

धोंडराई, नित्रूड, आडस, टाकरवण, जातेगाव, होळ, जिरेवाडी, बनसारोळा, बंगाली पिंपळगाव, मानूर, मोरेवाडी, तेलगाव, कोळगाव, जाटनांदूर, जवळगाव, सायगाव, सौताडा, मोगरा, आष्टा ह.ना., पाली, यूसफवडगाव, चेनई, केसापुरी, दादेगाव, पुस, गढी,पिंपळनेर, तिंतरवणी.

# एन एस बी कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून शेतकऱ्यांना आधुनिक शेती विषयक मार्गदर्शन

**नांदेड | प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ संलग्नित नेताजी सुभाषचंद्र बोस कृषी महाविद्यालय मरखेल येथील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जनजागरूकता कार्यक्रमांतर्गत मुखेड तालुक्यातील सावळी या गावी जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. या ठिकाणी उपस्थित कृषी सहाय्यक अधिकारी अलाडवाड सुदर्शन सूर्यकांत व सह अधिकारी मधेवाड एन. एल. आणि महाविद्यालयाच्या सातव्या सत्रात शिकल असलेले विद्यार्थी समीर शेख, शुभम सोनकांबळे, माधव पळते, प्रियश बोरकर, नागेश पाटील, अभिजीत वाघ आणि पृथ्वीसाई यांनी गावाची पाहणी करून शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणींची माहिती घेतली व प्रत्यक्ष शेतीची स्थिती, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग, कीडनियंत्रण, खत व्यवस्थापन, बदलत्या हवामानाचे परिणाम व पोखरा योजनेबाबत मार्गदर्शन केले.

जि.प्र.प्रा. शाळा सावळी येथे कृषी मेळाव्याचे आयोजन करून शालेय



विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य एम.आर. मुळे सर, कार्यक्रम समन्वयक डॉ. अर्चना राठोड मॅडम, तसेच कार्यक्रमाधिकारी प्रो. राठोड ए. डी. सर उपस्थित होते आणि त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या ठिकाणी गावातील सरपंच राहुल संजय शिगरे व तसेच समस्त गावकरी बांधव उपस्थित होते..

# साईबाबा मंदिर येथे साईलीला ग्रंथ पारायण सोहळा व बक्षीस वितरण

**नायगाव | प्रतिनिधी**

नायगाव शहरातील जागृत देवस्थान असलेल्या दर वर्षी पवित्र श्रावण महिन्यात होनारा श्री साईचरीत्र पारायण सोहळा याही वर्षी भव्यदिव्य स्वरुपात साजरा करण्यात आला त्या मध्ये एक आगळा वेगळा उपकृम म्हणजे श्रावण मासानिमीत्याने साई चरीत्र ग्रंथावर आधारित स्पर्धा साईनाथ महाराजांच्या संकल्पना घेण्यात आली साईबाबा मंदिरात आज दिनांक ७ ऑगस्ट रोजी साईलीला ग्रंथाची सांगता व बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला श्रावण महोत्सवाच्या निमित्ताने साईबाबा मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहेत साईलीला चरित्र प्रसंगातील माहितीवर आधारित स्पर्धा घेण्यात आली होती या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सौ साई भक्त निर्मला सुधाकरराव पवार तर द्वितीय क्रमांक साईभक्त पूजाराणी अविनाश मोरे सौ रुद्रावती साईनाथ शिंदे सौ कलावती देविदास बोंमनाळे सौ प्रतिमा अविनाश मोरे तर उत्तेजनार्थ पारितोषिक अनिता टोकलवाड सो मनीषा कपिल गारटे सौ साई भक्त



कविताताई विजय पाटील चव्हाण सौ आशाताई पांडुरंग पाटील चव्हाण यांनी स्पर्धाकांना साई स्वरूप श्री साईबाबा प्रतिमा चांदीच्या शिक्का श्री चा फोटो शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला यासोबतच साई परिवारातील सर्व सेवेकऱ्यांचा देखील सन्मान करण्यात आला साई भक्त अतुल चालीकवार, यांच्या उत्तम सेवेची दखल घेऊन सन्मान करण्यात आला यावेळी नायगाव नगरपंचायत चे उपाध्यक्ष विजय पाटील चव्हाण साई बाबा मंदिर ट्रस्टचे सचिव पांडुरंग पाटील चव्हाण साईबाबा मंदिराची पुजारी साई भक्त साईनाथ महाराज व्यंकट शिंदे शरद इंगळे ईश्वर दगडे बबलू ठाकूर साई बोरड कैलास रामदिनवार बालाजी कोंकेवाड रोहिदास पा चव्हाण गुरुनाथ मदेवाड यश टोकलवावा निवृत्ती मामा तेलंगे नरसिंग पांचाळ कैलास रामदिनवार साईनाथ कवटीवार तसेच समस्त साईपरीवारीती सर्व महिलाव परिसरातील हजारो साईभक्त महिला पुरुष उपस्थित होते महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली

# १०३ वर्षांच्या इंदिराबाई हुगे यांचे वृद्धापकाळाने निधन

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

येथील वीरशैव लिंगायत कोष्टी समाजाच्या जुन्या पिढीतील ज्येष्ठ महिला हैदराबाद बँकेशेजारी, मोंढा हालगे गल्ली येथील रहिवासी श्रीमती इंदिराबाई शंकरआप्पा हुगे (वय १०३) यांचे वृद्धापकाळाने (आज दि.६ ) रात्रीच्या सुमारास निधन झाले. पत्रकार संतोष जुजगर यांच्या त्या आजी होत.



श्रीमती इंदिराबाई हुगे या अत्यंत कष्टाळू, संयमी व धार्मिक वृत्तीच्या महिला होत्या. त्यांचे संपूर्ण आयुष्य त्यांनी कुटुंबासाठी समर्पित केले. एक कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून त्या परिचित होत्या. संतोष व वामन या दोन नातवांवर त्यांचा विशेष स्नेह होता. हुगे व जुजगर परिवासाठी एक आधारवड असे आयुष्य त्यांनी घालवले. धार्मिक वृत्तीच्या इंदिराबाई यांची पवित्र श्रावणात वयाच्या १०३ व्या वर्षी प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे स्नेही,आप्तेष्ट व परिचितांमधून शोकसंवेदना व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात एक मुलगी सौ. गंगाबाई विष्णू आप्पा जुजगर, नातू वामन व संतोष जुजगर, नातसुना, तीन पणतू, एक पणती असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने जुजगर परिवारावर कोसळलेल्या या दुः खात दै वादळ वार्ता परिवार सहभागी आहे.

# कत्तलखान्यांना परवानगी द्यावी

## निर्णय: कुरेशी संघटनेच्या परळी नगर परिषदेस निवेदन

**परळी | प्रतिनिधी**

राज्य कायदेशीर नियमानुसार परळी शहरात कत्तलखान्यांना परव-ानगी देण्याची मागणी कुरेशी संघटनेच्या वतीने परळी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत नुकतेच काल दिनांक ४ जुलै रोजी कुरेशी संघटनेच्या वतीने परळी नगर परिषदेचे मुख्याधि काऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, आमच्या भागात पारंपारिक पद्धतीने चालणाऱ्या जनावरांच्या कत्तलखाने सुरू यामध्ये म्हैस, रेडा, शेळी, मेंढी कत्तल्लीचे कायदेशीरपणे लघु चे परवानगी देण्यात यावी. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग यांच्या २२ जुलै २०१४ च्या परिपत्रकानुसार ज्या गाव-शासनाच्या ामध्ये ९ किंवा त्यापेक्षा कमी जनावरांची दररोज कत्तल होते. तेथे मॉडर्न स्लाटर हाऊस चे गरज नाही. तसेच प्रदू षण कंट्रोल बोर्डाचे ना हरकत प्रमाणपत्राचे ही आवश्यकता नाही. अशा ठिकाणी स्थानिक ार स्वराज्य संस्थेच्या परवानगी-ने पारंपारिक लघुकत्तलखाने सुरू करता येऊ शकतात. तसेच त्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेने जनतेचे आर-ोग्य स्वच्छता आणि जनावरांच्या कत्तलीसंदर्भात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्या ची जबाबदारी आहे. गेल्या काही वर्षापासून आमच्या व्यवस-करण्या ायाला बेकायदेशीर समजून अडथळे



निर्माण केले जात आहेत. तरी वस्तुस्थिति आणि शासनाच्या नियमांचा वापर करून एक छोटच्या स्वरूपाचा लघुकत्तरखाना सुरू करण्यास परळी नगर परिषदेने परवान-गी द्यावी जेणेकरून आरोग्य विषयक नियमांचे पालन होईल व व्यापाऱ्यावर अन्याय होण-नाही. यासाठी लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्या-ची विनंती कुरेशी संघटने-ने केली आहे. या निवेदनावर कुरेशी संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष कादर कुरेशी, परळी अध्यक्ष महबूब कुरेशी, परळी तालुका अध्यक्ष फैजल कुरेशी, यांच्यासह आलीशेर कुरेशी, जामीन रशीद कुरेशी, निसार कुरेशी, अफरोज कुरेशी, शहबाज कुरेशी, तारेख कुरेशी, मुखेद कुरेशी, शहनवाज कुरेशी, ताहेर कुरेशी, मुजफ्फर कुरे-शी आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# कानडीमाळी येथे एक पेड मा के नाम २.० अभियानअंतर्गत वृक्ष लागवड मोहिमेचे यशस्वी आयोजन

**केज | प्रतिनिधी**

कानडीमाळी ता.केज जि.बीड येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने माननीय जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बीड जिल्ह्यात एक कोटी वृक्ष लागवडीचे ध्येय दिनांक ७ जुलै रोजी आयोजित करण्यात आले होते.कानडीमाळी परिसरात भव्य वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेंतर्गत सुमारे १००० वृक्षांचे लागवड यशस्वीरित्या पूर्ण झाली असून परिसर आता हरित क्षेत्रात रूपांतरित होत आहे. ही मोहिम ग्रामस्थांच्या सहभागाने आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने पार पडली.शालेय विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवला. लागवड केलेल्या वृक्षांमध्ये आंबा, सागवान,चिंच,कडुलिंब, बाभळी आदी देशी व पर्यावरणपूरक प्रजातींचा समावेश आहे.या उपक्रमाबद्दल बोलताना ग्रामपंचायतचे सरपंच श्री.अशोक राऊत यांनी सांगितले की,पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज आहे. वृक्षलागवड ही केवळ एक सामाजिक जबाबदारी नसून भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे.यावेळी गावचे उपसरपंच बाळासाहेब राऊत ग्रामपंचायत सदस्य मसुराम राऊत,राहुल राऊत,रामेश्वर राऊत, स्थानिक शाळेचे मुख्याध्यापक,तलाठी, मंडळ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व वनविभागाचे अधिकारी यांनी देखील या उपक्रमात मोलाची भूमिका बजावली. लागवडीनंतर या झाडांचे संगोपन व देखभाल यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदरील कार्यक्रमासाठी कानडीमाळी ग्रामपंचायत अधिकारी श्री.शंकर हेडगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. परिसरातील लोकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणा वर वृक्षलागवड करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077